सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,ता.पनवेल जि.रायगड यांचे कार्यालय
मिडल क्लास हौसिंग सो.लि.प्लॉट क्र.८३सुशिलानिवास, पनवेल
दुरध्वनी क्रमांक :- ०२२२७४५२९८३ email :- arcspanvel@rediffmail.com

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम१९६०चे कलम ७७ (अ)अन्वये आदेश

जा.क्र.सनिप/विकास—५/एच.ओ.सी.कर्म.पत./ 9269 /क७७/२०१७
दिनांक 08 /08/२०१७

वाचले:— १. निवडणुक निर्णय अधिकारी एच ओ सी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., लोणीवली रसायनी, ता. पनवेल, जि.रायगड.यांचे दिनांक २०/०१/२०१७ रोजीचे पत्र.

२. श्री.राजेंद्र कृष्णा चौधरी, श्री.कन्हैया नि.नारंग व श्री.संजय प्र.गायकर यांचे दिनांक ०५/०७/२०१७ रोजीचे पत्र.

३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अअअ (५)(अ) व ७७ अ (१)(बी) मधीत तरतुद.

ज्याअर्थी एच ओ सी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., लोणीवली रसायनी, ता. पनवेल, जि.रायगड ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम यामधील तरतुदींनुसार नोंदणीकृत संस्था आहे. व तिचा नोंदणी क्रमांक केबीए/बीएनके/११९/, दि.१५/०९/७०.असा आहे. आणी,

ज्याअर्थी सदर संस्थेचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम व संस्थेचे मंजूर उपविधी या मधील तरतुदींनुसार चालविणे सदर संस्थेवर बंधनकारक आहे. आणि,

ज्याअर्थी सदर संस्थेचे व्यवस्थापक समितीची मुदत संपल्यामुळे नवीन समितीची रचना करण्यासाठी संस्थेचे निवडणुक निर्णय अधिकारी यांनी सदर संस्थेचा निवडणूक कार्यक्रम जाहिर करून निवडणूक प्रक्रियेनुसार नामनिर्देशन पत्रे दाखल करण्याचा कालावधी (दिनांक १६/०१/२०१७ ते दिनांक २०/०१/२०१७) असा होता. परंतु सदर कालावधीमध्ये एकही नामनिर्देशन प्राप्त झाले नसल्याचे निवडणुक निर्णय अधिकारी यांनी उपरोक्त वाचले क्रमांक १ नुसार या कार्यालयास कळविले आहे.आणि,

ज्याअर्थी कायदा कलम ७७ अ (१) (बी) मधील तरतुदींनुसार ज्यावेळी संस्थेची निवडणुक होईल त्यावेळी संस्थेचे काही किंवा सर्व सदस्य

निवडण्यात अपयश आल्यास निबंधक अशा संस्थेच्या समितीवर प्राधिकृत मंडळाची नियुक्ति करता येईल. अशी तरतुद आहे. आणि,

ज्याअर्थी प्राप्त परिस्थितीत सदर संस्थेची निवडणुक घेवूनही संस्थेच्या समितीच्या एकुण ११ जागांसाठी एकही नामनिर्देशन प्राप्त झाले नसल्याने संस्थेचे सदस्य निवडण्यात अपयश आलेले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ अ अ अ (५)(अ) नुसार दोन तृतीयांश किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य निवडुण येणे आवश्यक आहे. परंतु निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सादर केलेल्या वाचले क्रमांक १ च्या पत्रानुसार संस्थेच्या पात्र सभासदांमधुन एकही नामनिर्देशन प्राप्त झालेले नाही. सद्यस्थितीमध्ये संस्थेची समिती गठीत होत नसल्यामुळे संस्थेचे कामकाज ठप्प होण्याची परिस्थिती निर्माण झालेली आहे.

ज्याअर्थी उपरोक्त वाचले क्रमांक २ चे पत्रान्वये संस्थेचे सभासद श्री.राजेंद्र कृष्णा चौधरी, श्री.कन्हैया नि.नारंग व श्री.संजय प्र.गायकर यांनी प्राधिकृत अधिकारी मंडळ म्हणुन काम करण्यास संमंती दर्शविली आहे. अशावेळी कायद्यातील तरतुदींनुसार सदर संस्थेवर तातडीने प्राधिकृत अधिकारी मंडळाची नियुक्ती करणे क्रमप्राप्त झालेले आहे. याबाबत माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७(अ) अन्वये प्राप्त अधिकारानुसार मी चेतन चौधरी, सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, पनवेल असा आदेश देतो की, एच ओ सी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., लोणीवली रसायनी, ता. पनवेल, जि.रायगड. ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व त्याखालील नियम १९६१ यामधील तरतुदींनुसार नोंदणीकृत संस्था आहे. व तिचा नोंदणी क्रमांक केबीए/बीएनके/११९/, दि.१५/०९/७० असलेल्या सहकारी संस्थेच्या विद्यमान व्यवस्थापक समिती ऐवजी संस्थेचे दैनंदिन व्यवस्थापन चालविणेसाठी खालीलप्रमाणे प्राधिकृत अधिकारी मंडळाची नियुक्ती करीत आहे.

१) श्री.राजेंद्र कृष्णा चौधरी — अध्यक्ष,प्राधिकृत अधिकारी मंडळ
२) श्री.कन्हैया नि.नारंग — सदस्य,प्राधिकृत अधिकारी मंडळ
३) श्री.संजय प्र.गायकर — सदस्य,प्राधिकृत अधिकारी मंडळ

तसेच आणखी असाही आदेश देतो की, सदर प्राधिकृत अधिकारी मंडळाने संस्थेच्या दप्तर व मालमत्तेचा पदभार घेवुन सहा महिने मुदतीपर्यंत संस्थेचे दैनंदिन कामकाज पहावे व याच मुदतीत संस्थेच्या नवीन समितीची निवडणुक घेणेसाठी कार्यवाही करून नवीन समितीकडे पदभार सुपुर्त करावा.

सदर आदेश मी आज दि.०८/०६/२०१७ रोजी माझे सही शिक्यानिशी दिला असे.

(चेतन चौधरी)
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,पनवेल,ता. पनवेल

स्थाळ:— पनवेल
दिनांक०८ / ०६/ २०१७

प्रति,

१) श्री.राजेंद्र कृष्णा चौधरी — अध्यक्ष,प्राधिकृत अधिकारी मंडळ
२) श्री.कन्हैया नि.नारंग — सदस्य,प्राधिकृत अधिकारी मंडळ
३) श्री.संजय प्र.गायकर — सदस्य,प्राधिकृत अधिकारी मंडळ

२/- त्यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी संस्थेच्या दप्तराचा तसेच मालमत्तेचा ताबा त्वरीत घेवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

२)चेअरमन/ सेक्रेटरी, एच ओ सी कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्या., लोणीवली रसायनी, ता. पनवेल, जि.रायगड.

२/- त्यांना कळविण्यात येते की, संस्थेच्या संपूर्ण दप्तराचा/मालमत्तेचा ताबा नवनियूक्त प्रशासका कडे देवून तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) शाखा व्यवस्थापक, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅक लि.शाखा पनवेल / नवीन पनवेल

४) संस्थेच्या नोटीस बोर्डवर

सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था,पनवेल,ता.पनवेल

K. N. Narang